# ।। सोदागरी ग्रंथ ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग


महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

* वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ सोदागरी ग्रंथ लिखंते ।।

**सोदागरी चल्या जीव सोदे ।। भरत खंड मे आया ।।**
**केईक कर गया लाभ कमाई ।। केई एक मूळ ठगाया ।।१।।**

लोक जसे छोट्या छोट्या शहराहून वाणिज्य व्यापार करुन,कमाई करण्याकरीता मुंबई




सारख्या मोठ्या शहरांत येतात आणि आल्यावर काही लोक लाभ कमाई करतात तर काही लोक लाभ कमाई करण्याकरीता आणलेली मूळ रक्कम गमावून देतात.याच प्रमाणे जीव देशा देशाहून(निराकाराचे १३लोक महामाया ,प्रकृती,ज्योती,अजर,आनंद,वजर,इखर,अनहद,निरंजन ,निराकार,शिवब्रम्ह,महाशुन्य,पारब्रम्ह,साकारी ३ लोक स्वर्गलोक,मृत्युलोक,पाताळलोक, १४ भवन– भूर,भूवर,स्वर,महर,जन,तप,सत,तळ,.अतळ,वितळ,.सुतळ,तळातळ, रसातळ,महातळ,४ पुऱ्या–सतलोक ,वैकुंठलोक,कैलासलोक, शक्तिलोक व यमलोक) सदासाठी आवागमनाच्या काळाच्या दु:खातून निघावे आणि अगणित महासुखात जावे हा सौदा करण्यास मृत्युलोकाच्या भारत देशात मनुष्यदेह आणला आहे.असा देह धारण केल्याने रामनाम म्हणजे काळाच्या दु:खातून निघण्याचे परमात्माचे नाम प्राप्त होते. कैक जीव भरतखंडात जन्म घेतात आणि रामनाम देहात प्राप्त करतात आणि आपला जन्म मरण्याच्या चक्र सदासाठी मिटवतात तर कैक जीव भरतखंडात आल्यावरही हा भारी मनुष्यदेह पाच प्रकारच्या शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध या विकारात आणि कुटूंब परीवाराच्या मोहमायेत लावून गमावून टाकतात. ।।१।।

**ईन्द्र आद ब्रम्हा दिक बंछत ।। ओ नर तन हे भाई ।।**
**राम भक्त और साध समागम ।। इसो लाभ इण माई ।।२।।**

आदी सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,चार प्रकारचे मायावी देह आहे. होणकाळात पारब्रम्हचा सुक्ष्मब्रम्हस्वरुप तन व ३ लोक १४ भवनात साकारी मायेचे ३ प्रकारचे तन आहे.

१.स्वर्गाच्या देवतांचा तेजपुंजाचा(अग्नीचा देह)देह ज्यात जीवाला मनचित्या सुख मिळते.

२.नरकाचा याचनिक देह–ज्यात जीवावर कितीही असहय दु:ख पडले तरीही देहातून प्राण निघत नाही व मृत्युलोकाचे ८४ लक्ष प्रकारचे मलमुत्राचे शरीर जिथे जीवाला मरण अनचिंत्याच येते असे मलमूत्राचे ८४ लक्ष प्रकारच्या शरीरातच एक मनुष्य शरीर आहे.हे मनुष्य शरीर असे आहे की,याला मनचिंत्या सुख भोगणारा स्वर्गाचा ३३ करोड देवतांचा राजा इंद्र तसेच ३३ करोड देवता आणि इंद्राच्या वरचा सुख भोगणारा

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

सतलोकाचा नाथ ब्रम्हा,वैकुंठाचा नाथ विष्णू, कैलासाचा राजा शंकर तसेच त्यांच्या लोकाचे सर्व देवता चाहना करतात.हे ब्रम्हा,विष्णू,महादेव तसेच इंद्र व त्यांच्या लोकाचे सर्व देवता रात्रंदिवस डोळ्यांनी पाहतात की आम्हाला तेजपुंजाच्या देहाने सदा रात्रंदिवस मनचिंत्या सुख मिळतात आणि ते सुख आम्ही भोगतो आणि सोबत काळाच्या मुखातून मुक्त होण्याकरीता परात्परी परमात्मादेव रामाचे स्मरण ही करतात परंतु तो राम आमच्या तेजपुंजाच्या घटात थोडासाही संचित होत नाही. ज्याच्याने घटात परात्परी परमात्मा प्रगट होत नाही. त्यांना हे पण दिसते की मृत्युलोकात भरतखंडात मनुष्य तनात परमात्मादेव रामाच्या साधूची संगत मिळते आणि ती संगत केल्यावर परात्परी परमात्मादेव राम जीवाला मनुष्य घटात सहज प्रगट होतो.ज्याच्याने जीव सदासाठी जन्म मरणापासून मुक्त होतो असा भारी लाभ म्हणजे कमाई मनुष्य तनात आहे हे त्यांना दिसते.यासाठी या मलमुत्राच्या देहाची चाहणा हे ब्रम्हा,विष्णू,महादेव तसेच इंद्र करतात. ।।२।।

**नर तन बडो पदारथ पायो ।। भजन करो नर नारी ।।**
**सिंवरण जिसा बिसऱ्या सोदा ।। पसु संग्या ले धारी ।।३।।**

आदी सतगुरु सुखरामजी महाराज सर्व नर नारींना,ज्ञानी,ध्यानी यांना सांगून राहिलेत की ज्या मनुष्य देहाची चाहना ब्रम्हा,विष्णू,महादेव व इंद्र करतात अशा भारी महाग मनुष्य देहाची वस्तू आज तुम्हा सर्वांना प्राप्त झालेली आहे.ती ही भरत देशात प्राप्त झाली आहे यासाठी आपण सर्व नरनारीनों या मनुष्य तनाने वेळी अवेळी परमात्मा देवाचे भजन करा. जर परमात्मा देवाचा स्मरण करण्याचा सौदा विसरुन गेले आणि विकारी विषय वासनातच भुललेले राहिले तर मलमुत्राचे ८४ लक्ष योनीतील पाची विकारी सुख घेणाऱ्या पशु देहात पडलेले जीव आणि मनुष्य तनात आलेला तुमचा जीव यांच्यात काहीच फरक राहणार नाही.।।३।।

**जके जंजाळ जागताँ बिपता ।। सांज पड़ी जब सायो ।।**
**सूताँ बिपत पड़ी सपना मे ।। पसू उगांळेर खायो ।।४।।**

मनुष्य तनात आलेला प्रत्येक जीव दिवसा जागृत अवस्थेत नाना प्रकारच्या विपत्तींनी भरलेला मायावी जंजाळ करतो आणि संध्याकाळ झाल्यावर झोपतो आणि झोपेत स्वप्नात तेच विपत्तीच्या जंजाळात रात्र पूर्ण करतो.जसे ८४ लक्ष योनीचे काही पशु जीव दिवसा खातात आणि रात्री खाल्लेली प्रत्येक वस्तू उगाळतात(म्हणजेच रवंथ करतात).आदी सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असे पशु जीवाच्या स्वभावा सारखे अनेक मनुष्य जीव भारी मनुष्य पदार्थ मिळाल्यावरही आपला मनुष्य देह गमावतात. ।।४।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**घर की गांगरत गयो जमारो ।। उदम आपदा माही ।।**
**मूसे ठगे भरे एक ऊदर ।। पसू संग्या आ पाई ।।५।।**

आदी सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की याप्रकारे जीव मनुष्य तन मिळाल्यावर ही घराच्या गाऱ्हाण्यात म्हणजे आई,वडिल,भाऊ,बहिण,पत्नी,पुत्र,पुत्री यांच्या मायावी आकांक्षा पूर्ण करण्यात मग्न होऊन जातो.या सर्वांच्या आकांक्षाना पूर्ण करण्यासाठी धन पाहिजे यासाठी उद्योग धंदा करतो आणि त्या उद्योग धंद्यात अनेक भारी भारी कष्ट झेलतो आणि अनेकांच्या माना मुरगळून घरावाल्यांच्या चाहणा पूर्ण करण्यासाठी धन जोडतो.या प्राप्त केलेल्या धनाने तो स्वत:साठी काय करतो तर फक्त पोट भरण्याच काम करतो.आदी सतगुरु सुखरामजी महाराज सर्व नर–नारींना सांगतात की फक्त पोट भरणे ही मनुष्य संज्ञा नाही आहे फक्त पोट भरणे ही तर पशु संज्ञा आहे. ।।५।।

नर संग्या ।।

**ग्यान ध्यान गुण साध समागम ।। सिंवरण कथा बिलासा ।।**
**जागे जिते राम ही सिंवरे ।। सूताँ ओई अभ्यासा ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मनुष्य संज्ञा काय आहे तर काळा–पासून मुक्त करणाऱ्या रामजीचे ज्ञान,रामजीचे ध्यान करणे,जे काळापासून मुक्त झाले आणि रामजी घटात प्राप्त केलेल्या अशा साधूंची मग तो गृहस्थी असो किंवा वैरागी असो त्यांची संगत करणे आणि त्यांच्या मुखातून निघालेली रामजीच्या देशाची कथा विलास म्हणजे प्रत्येक वाणी ऐकणे आणि त्यांनी सांगितलेल्या विधीने जागृत आहे तोपर्यंत रामजीचे स्मरण करणे.याप्रकारे रामभक्ती आणि साधू समागम केल्याने झोप आल्यावरही सतस्वरुप रामाचे ज्ञान,ध्यान,स्मरण आणि साधू समागम आपोआप होतच राहील. ।।६।।

**माया मोह भ्रम की रजनी ।। सूता जीव अघाई ।।**
**सतगुरू अवाज करी अेक अेसी ।। राम कहो मेरा भाई ।।७।।**

परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जसे कोण्या गावातील एखादा मूर्ख मनुष्य घोर अंधाऱ्या रात्रीत पूर्ण गावाला चोर डाकूंचा खूप भय असतांनाही अशा भारी धोक्याचा कोणताच भय न ठेवता निश्चिंत होवून झोपतो आणि धोका होतो. याचप्रकारे सर्व जीव त्रिगुणी मायेच्या सुखांच्या मोहात भ्रमीत होवून मनुष्य देह गमवित आहे.त्रिगुणी मायेच्या सुखात जालिम यमराज ओतप्रोत बसलेला आहे आणि हा यमराज ४३,२०,००० वर्षांपर्यंत ८४,००,००० योनीचे जन्म मरणाच्या चक्रात प्रत्येक श्वासा–श्वासात फसवत आहे.अशी थोडीशीही भनक न आणता मनुष्य देह माया

मोहात परीपूर्ण लावत आहेत.या धोक्याची समज सतगुरुला होत असल्या कारणाने हे सतगुरु जीवांना आवाज देवून देवून म्हणजे ओरडून ओरडून समजावून राहिलेत या मायेच्या मोहात काळाचा भारी धोका आहे.या धोक्यातून बाहेर निघण्यासाठी सर्व स्त्री पुरुषांना भाऊ म्हणून सांगून राहिले आहेत की,अरे भाऊंनो काळापासून मुक्त करणारे आणि मायेच्या पलीकडच्या अगणित सुख देणाऱ्या रामाचे स्मरण करा. ।।७।।

**मिनषा देही सुभ हे औसर ।। राम भजन लिव लावो ।।**
**भौ सागर का हे दु:ख भारी ।। जलम मरण मिटावो ।।८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या सर्व स्त्री पुरुषांना सांगत आहे की,अरे जीवांनो,भवसागराचे दु:ख भारी आहे.या भवसागरात शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध यांचे जीवाला थोडेसेच सुख आहे परंतु ४३,२०,००० वर्षांपर्यंत ८४,००,००० योनीत वारंवार गर्भात येवून जन्मण्याचे आणि कष्टाने भरलेले म्हातारपण प्राप्त करुन मरण्याचे भारी दु:ख आहे.अशा भारी दु:खातून सदाकरीता निघण्यासाठी मनुष्य देहाची आवश्यकता आहे.तो मनुष्य देह जो ब्रम्हा,विष्णू,महादेव,इंद्र,३३ करोड देवता चाहल्यावरही मिळत नाही अशी शुभ संधी तुम्हा सर्व स्त्री,पुरुषांना मिळाली आहे म्हणून माया मोहाच्या झोपेत गाढ न झोपता काळाच्या दु:खाचे भय ठेवून जागृत होवून आणि महासुखाचे दाता रामजीच्या भजनाशी लिव लावा. ।।८।।

**सूताँ जलम अमोलक बीते ।। जागो जब पिस्ता हो ।।**
**जिवड़ो पड़यो जंजाळा माही ।। सपने जलम ठगा हो ।।९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व नर नारींना सांगतात की ४३२०००० वर्षांपर्यंत ८४००००० योनीचे अनेक जुलूम कष्ट भोगल्यावर तसेच ब्रम्हा,विष्णू,महादेव आणि इंद्रासारखे देवतांना मागितल्यावरही न मिळणारा मनुष्य देह जो तुम्हाला मिळालेला आहे असा अमोलक देह व्यतीत होवून जाईल.असा अमोलक देह शेवटचा श्वास सोडण्याची वेळ येईल आणि यमराजची फौज समोर दिसेल तेव्हा कितीही जागृत झाला तरीही मनुष्य तन गमवून दिले या पस्ताव्याशिवाय आणखी काहीही हातात येणार नाही.अशी पस्ताव्याची वेळ यासाठी आली की दिवसा घराच्या जंजाळ्यात म्हणजे आई,वडिल,भाऊ,बहीण,पुत्र,पुत्री,पत्नी यांच्या खोट्या मायेच्या आकांक्षा पुर्ण करण्यात अनमोल जन्म लावून दिला आणि रात्र हातात होती ती याच विपत्तींच्या स्वप्नांनी ठगून घेतली.याप्रकारे प्रत्येक जीवाची रात्र आणि दिवस घराच्या जंजाळात व्यतीत होतात आणि यमाच्या हातात जाण्याच्या अंतीम समय आपोआप येवून जाते.।।९।।

**जीवण अलफ अवध हे ओछी ।। माया सबे बिराणी ।।**
**तीतर बाज काळ युं दाबे ।। आसा सकळ बिलाणी ।।१०।।**

आदी सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री पुरुषांना चेतवून राहिले की,ज्या देहाने जन्म मरण सुटू शकते अशा मनुष्य देहाची आयु ४३,२०,००० वर्षाचे ८४,००,००० योनीच्या फेऱ्यासमोर हा फेरा १०० वर्षाचा पकडला तर फक्त दहा दिवसाची आहे. विष्णूचे आयुष्य महाप्रलय पकडले तर याची आयु विष्णूच्या आयुसमोर पळात ही नाही याला मोजून ७७,७६,००,००० श्वास १०० वर्षांसाठी मिळालेले आहे परंतु याची पक्की आयु आतला श्वास बाहेर काढेल इतकी म्हणजेच दोन सेकंदाचीच आहे.जसे बाज पक्षी तितर पक्ष्याला त्याला उडण्याची समज यायच्या आधीच(दाबून टाकतो)कुचलून टाकतो.असा जालीम यमराज जीवाला अचिंत्याच चिरडून टाकतो.तेव्हा धन,राज,घर, महल ही भारी माया जी पूर्ण मनुष्य देहाच्या आयुष्यात कमविली होती.ती आपली असूनही परकी होती.कारण ती माया जीवाच्या सोबत चालू शकत नाही आणि काळाच्या मुखातून निघण्याची आशा पूर्ण मिटून जाते.।।१०।।

**तन धन जोबन देखत जासी ।। ज्यू बादळ की छायाँ ।।**
**अंजळी नीर ओस का पाणी ।। सब सपना की माया ।।११।।**

आदी सतगुरु सुखरामजी महाराज प्रत्येक मनुष्य जीवाला सांगून राहिले आहेत की,हा पाच तत्वाचा मनुष्य देह हे हिरा-पन्ना,सोने-चांदी रुपये,शेती-बाडी,बंगला,प्लॉटस इ. प्रकारचे धन तसेच पाची इंद्रियाची पूर्ण जवानी ही डोळ्यांसमोर बघता बघता निघून जाईल.जसे-वैशाखात सुर्य तापतो आणि जीवावर ढगाची सावली येते आणि त्या सुर्याच्या तापाच्या दुःखासमोर ढगाच्या सावलीचे सुख चांगले लागते आणि तो जीव घेतो व तो जीव सुख घेत नाही तोपर्यंत ती सावली संपून जाते.याप्रकारे होनकाळाच्या दुःखासमोर हे तनाचे सुख,धनाचे सुख आणि जवानीचे सुख जाण्यास वेळ लागत नाही.जसे-ओंजळीत घेतलेले पाणी दवाचे पाणी जाण्यास वेळ लागत नाही-असेच ज्या तन,धन,जवानीच्या भरवश्यावर सुख मिळण्याच्या चाहनाने जीव बसलेला आहे तो जाण्यास वेळ लागत नाही.जसे-स्वप्नात मनुष्याला मायेचे सुख मिळते ते सुख जागताच संपून जाते.याचप्रकारे मनुष्य तनाच्या शंभर वर्षात तन,धन,जवानीचे सुख घेतो.ते सुख शरीर सुटताच स्वप्नांच्या सुखांसारखे मिटून जातात. ।।११।।

**मात पिता सुत नार स्नेही ।। इण ठग नगरी जिव मोयो ।।**
**समझ्यो नही मुसाफर पेली ।। जलम ठगायर रोयो ।।१२।।**

हे आई,वडिल,पत्नी,मुलगा व स्नेही यांनी जीवाला जन्म-मरणापासून मुक्त होण्याच्या कार्यात न जावू देता,आपल्या मायावी विकारी सुखांची पूर्तता करुन घेण्यात लावून दिले आणि दुर्भाग्याने जीव ही या आई,वडील,पत्नी,मुलगा व स्नेही यांच्या ठग नगरीत मोहीत होवून गेला.हा जीव जोपर्यंत रामजीचे स्मरण करु शकत होता तोपर्यंत स्मरण

करणे समजले नाही आणि जेव्हा शरीर सोडण्याचा अंतसमय आला आणि काळाचे महादु:ख समोर दिसू लागले तेव्हा मनुष्य जन्म ठगल्या गेला याकरीता दु:खी होवून रडला. ।।१२।।

म्हे मेरी मे अवध गमाई ।। जलम बदी तो बाताँ ।।
सिंवरण सोदा कदे हन कीना ।। ओ हीर मुसायो हाताँ ।।१३।।

मी आणि माझ्यात,मी आहो आणि हे सर्व कुटूंब परीवार,धन,महाल माझे आहे याच्यात सर्व आयुष्य गमवून दिले आणि सर्व जन्म इकडच्या तिकडच्या बिना गरजेच्या व्यर्थ गोष्टी करण्यात गमवून दिला.रामजीचे स्मरण करण्यासारखा सौदा पूर्ण आयुष्यात कधी केला नाही आणि शेवटी सौदा करण्यासाइी आणलेला मनुष्य हिरा हाताने गमवून दिला. ।।१३।।

कीजे काज आज ओ औसर ।। अवद ओस का पाणी ।।
सिर पर काळ रेण दिन गरजे ।। जम जालम हे डाणी ।।१४।।

आदी सतगुरु सुखरामजी महाराज प्रत्येक स्त्री–पुरुषांना सांगतात की,काळापासून मुक्त होण्याचे कार्य करायेच आहे तर आज ही वेळ आलेली आहे.ही वेळ दडाच्या पाण्यासारखी जायला वेळ लागणार नाही.हा यम जुलूमी आहे आणि तो जीवाची ही अवधी जाण्याची रात्र–दिवस टक लावून वाटच पाहत आहे आणि जीवाला जीवाच्या हातातून मनुष्य देहाची अवधी जाताच क्रुर दु:ख भोगविण्याकरीता रात्र दिवस जीवाच्या शिरावर गरजून राहीला आहे.।।१४।।

काळ कटक सू सब जग धूजे ।। सुर नर घराँ अे हेड़ो ।।
जलम्या जका गया दिन दूरा ।। यू अंत काळ दिन नेड़ो ।।१५।।

अशा जालिम(जुलूमी)काळाचे १४ यम आणि १४,००००००० यमदुताच्या बनलेल्या फौजेने नरकाच्या किड्यापासून तर वैकुंठाच्या विष्णूपर्यंत सर्व ३ लोक १४ भवन आणि ४ पुऱ्या धुजून(कापून)राहीले आहेत.या काळाच्या फौजेच्या फेऱ्या देवताच्या सर्व लोकापासून ते मनुष्याच्या नऊ खंडांच्या सर्व घरात पड्त राहतात.आदी सतगुरु सुखरामजी महाराज सर्व जीवांना समजवित आहे की ज्या दिवशाी जीवाने मनुष्य जन्म घेतला तो दिवस तर दिवसेंदिवस दुर चालला आहे आणि अंतकाळचा दिवस, दिवसेंदिवस जवळ येत आहे.।१५।

बीवाँ आय उपाव न कोई ।। होसी कागा रोळा ।।
कुटम लुटेरो काया लूटे ।। जम जीव के दोळा ।।१६।।

अशीच ही आयु पूर्ण झाल्यावर मग काहीच उपाय लागणार नाही. मग बाकी लोक जसे एखादा कावळा मेल्यावर काव काव करत शेकडो कावळे जमा होवून गलगला करतात

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

तसेच कुळाचे लोक जमा होवून गलगला करतात तसेच कुळाचे लोक जमा होवून गलगला करतील आणि कुटूंबाचे सदस्य जे कालपर्यंत आपले होते ते लुटारुसारखे या कायेवर जे काही दागिने असतात ते सर्व दागिने हिसकून घेतील आणि यमाची फौज जीवाच्या भोवती लागून जाते. ।।१६।।

**पीव पीव कर नार पुकारे ।। पूत पूत कर माई ।।**
**कुरळे कुटम कबीलो सारो ।। इण जंवरे जंग मचाई ।।१७।।**

जसेच शरीराला प्राण सोडतो आणि मृतक शरीर धरतीवर पडते तसेच पत्नी मृतक शरीराला पाहून पाहून पती पती म्हणते आणि रडते आणि आई बाळा बाळा म्हणून रडते.या तऱ्हेने आपल्या कुटूंब कबील्याचे सर्व लोक कल्होळ करुन करुन रडतात.हे कोणीही शरीरातून निघालेल्या प्राणावर यमाचा भारी मार पडत असेल याचा थोडाही विचार करत नाही.इकडे शरीरातून काढलेल्या प्राणाच्या मागे जालीम यमाची फौज लागते आणि हातात आलेल्या प्राणाला क्रुर कष्ट देण्यासाठी यमाचे दूत जंग मचवितात. ।।१७।।

**सिर मे गुर्ज गळा मे फासी ।। जालम हे जम राणो ।।**
**सायक राम कदे नही सिंवऱ्यो ।। ओ सब लोक बिराणो ।।१८।।**

हे यमराजाचे दूत मनुष्य शरीर सुटल्यानंतर हातात आलेल्या प्राणाच्या डोक्यात गुरुज मारतात आणि त्या प्राणाच्या गळ्यात फासी टाकतात.हा यमराज मोठा जालिम आहे. सहायता करणारा राम होता त्याचे पूर्ण आयुष्यात कधी थोडेसेही स्मरण केले नाही ज्याच्याने यमराजाच्या क्रुर जुलूमापासून बचाव झाला नाही आणि पत्नी,आई, भाऊ, परीवाराचे सर्व चाहणारे सदस्य जे होते ते जीवासाठी परके होवून गेले,प्राणाचे राहिले नाही .।।१८।।

**झूटो कुटम बिषे सुख झूटा ।। काया माया झूटी ।।**
**जोवे खड़ा जोर नही लागे ।। आऊं रस सू तुटी ।।१९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री पुरुषांना सांगून राहीले आहेत की, देहापासून आत्मा वेगळा व्हायच्या आधी जे कुटूंबाचे सदस्य खरे दिसत होते ते सर्व यमाच्या दूतांनी प्राणाला घेरताच यमाच्या हातातून सोडवण्यासाठी खोटे निघाले. विषय वासनेचे सुख जे खरे सुख दिसून राहिले होते ते यमांना जीवाला कष्ट भोगविण्यात मदत करण्यात लागून गेले.असे विषय सुख ही खोटे निघाले.ज्या तरुण कायेच्या भरवशावर प्राण मी मी करत होता अशा कायेने प्राणाला यमाशी लढण्यात साथ दिली नाही आणि ती काया प्राणाला सोडून धरतीवरच पडून राहिली आणि ज्या धन,राज या मायेच्या भरवशावर पुढच्या सुखाचे गणित साधले होते ती माया इथेच पडून राहीली.

प्राणाच्या सोबत थोडीशीही आली नाही. याप्रकारे प्राणासाठी काया आणि माया दोघेही खोटे निघाले.सर्व लोक पत्नी,आई,मुलगा व परीवाराचे अन्य सदस्य आणि स्नेहीगण उभे उभे प्राण निघालेल्या देहाला पाहत राहतात आणि प्राण देहातून निघायला नको होता याचा विचार ही करतात परंतु परमात्म्याच्या इथून आयु खुटल्या कारणाने प्राण देहापासून वेगळा होवू नये देहातच रहावा तसेच वेगळा झाला तर यम मारणार नाही या चाहणेवर कोणाचाही जोर चालत नाही. ।।१९।।

**ब्होत कुटंबी जाय अकेलो ।। अेको संग न चाले ।।**

**सब स्वारथ की देख सगाई ।। दिन बीता दुःख पाले ।।२०।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री पुरुषांना सांगून राहिले आहेत की,जाणाऱ्या प्राणाशी अनेक चाहणाऱ्या सदस्यांनी कुटूंब भरलेले फुललेले होते परंतु चाहणाऱ्यांमधून एकही मनुष्य जाणाऱ्या प्राणासोबत चालला नाही,एकट्यालाच यमाचा मार सहन करत यमाच्या सोबत जावे लागले.याप्रकारे जीवाशी हे सर्व आई,वडिल,पत्नी,मुलगा,स्नेहीजन प्रत्येक जण आप आपल्या मायावी विषयांच्या सुखांच्या पूर्ततेच्या स्वार्थाने जुडलेला होता.अंतीम वेळी यमाच्या हाती पडल्यावर कोणी सोबत आले नाही आणि जसे जसे प्राणाचे शरीरापासून वेगळे होण्याचे दिवस व्यतीत होवू लागले तस तसे कुटूंब परीवारा पासून देह वेगळा होण्याचे दुःख कमी होऊ लागले.आजच्या सारखे दुःख उद्या राहिले नाही,उद्या सारखे परवा,परवासारखे तेरवा दुःख माहित झाले नाही.काही दिवसानंतर त्या जीवाचा विसर पडून गेला आणि मग कोणती आठवणही आली नाही. ।।२०।।

**अपणा परका भया सरीसा ।। माया सब धर दाटी ।।**

**मूस्या जका चल्या रिण साथे ।। आ खाय ओर ही खाटी ।।२१।।**

प्राण जिवंत होता तेव्हा जिवंत प्राणाशी जसा परक्या लोकांचा काही लगाव नव्हता याच प्रकारे शरीर सुटल्यावर आपल्या लोकांचे वर्तन झाले म्हणजे जाणाऱ्या प्राणासाठी आपले आणि परकेसारखे होऊन गेले.माया म्हणजे रुपये-पैसे,सोने-चांदी,हिरे जे जमिनीत गाडले होते ते जमीनीतच राहून गेले.त्याच्यात काहीही सोबत चालले नाही परंतु रुपये-पैसे,सोने-चांदी,हीरे हे धन जोडण्यात ज्या ज्या जीवांच्या माना मुरगळल्या ते ऋण बदला घेण्यासाठी सोबत रवाना झाले.आदी सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,वाईट कर्म करुन पैसे कमविले होते ते पैसे तर मागेच राहून गेले सोबत चालले नाही परंतु केलेले वाईट कर्म मागे न राहता सोबत चालू लागले आणि जे अनेक तऱ्हेचे कष्ट आणि कर्म करुन पैसे कमविले होते ते पैसे दुसरेच लोक खाऊ लागले आणि रामजीच्या कार्यात खर्च करण्याचे सोडून विकारी कर्मांमध्ये खर्च करुन पूर्ण करु लागले.।।२१।।

**सिंवर सिताब बिलम नही करणा ।। आव घटे तन छीजे ।।**
**बड़े दिसावर भगवंत भेज्या ।। कोई सुक्रत सोदा कीजे ।।२२।।**

तर आता या तऱ्हेने होत असते असे ज्ञानाने समजून लवकर सहायता करणाऱ्या रामजीचे स्मरण करा.आता स्मरण करण्यास विलंब करु नका.आपली परमात्मा देवाकडून मिळालेली आयु कमी कमी होत आहे आणि हे शरीर दिवसेंदिवस झिजून राहिले आहे,निर्बल होत आहे.आम्हाला भगवंताने परमात्म्याला मिळवून देणारे साधु जिथे राहतात अशा मोठ्या देशावरात पाठविले आहे.आता इथे रामजीला मिळण्याचा सुकृत सौदा करा. ।।२२।।

**भरत खंड मे नर देहे पाई ।। बड़े दिसावर आया ।।**
**सतगुरू स्हा मिल्या सोदागर ।। बिणज करो मन भाया ।।२३।।**

या मृत्युलोकात ९ खंड आहे.या ९ खंडात भरतखंड मोठा कमाई करण्याचा देश आहे. अशा भरतखंडात आम्हाला मनुष्य देह मिळाला आहे आणि रामजीला मिळवून देणारे सतगुरु सौदागर ही मिळाले आहेत.यासाठी आता सर्व मनुष्य भाऊंनी निजमनाने रामजी प्राप्त करण्याचा पोट भरुन व्यापार करा. ।।२३।।

**ईणी दिसावर सब संत आया ।। आइ मानव देहे पाई ।।**
**सतगुरू हाट राम धन बिणज्या ।। देखो सफळ कमाई ।।२४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना सांगतात की,आधीही काळाच्या तावडीतून अनंत संत मुक्त झाले.ते सर्व संत याच भरतखंडात आले होते आणि त्यांनीही आमच्या तुमच्या सारखा मनुष्य देहच धारण केला होता(आणि त्यांनी सतगुरुच्या दुकानावर जाऊन रामनामाचा व्यापार करुन परममोक्षाची कमाई केली आणि आपली कमाई सफल केली तसे तुम्हीही करा.)।।२४।।

**सासा रतन पराई पुंजी ।। सिंवरण सोदा कीजे ।।**
**खोटे बिणज राम रीसावे ।। खोटे निवि छीजे ।।२५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मनुष्य देह ७७,७६,००००० श्वासाचा बनविला आहे.हा ७७,७६,००००० श्वासाचा मनुष्य देह तुम्हाला जीवाची पुंजी नाही आहे.ही पुंजी दुसऱ्याने दिली आहे म्हणजे परमात्मा रामाने काळातून मुक्त होण्यासाठी दिलेली आहे म्हणजेच ही ७७,७६,०००००श्वासाची पुंजी रामजीच्या स्मरणाचा सौदा करण्यासाठी दिली आहे.जर ही पुंजी रामजीचे स्मरण करण्यात लावली नाही आणि कुटूंब परीवार,मोहमाया,पाच विषय वासना या काळाच्या मुखात ठेवणाऱ्या त्रिगुणी मायेच्या खोट्या व्यापारात लावली तर ज्या रामजीने ही पुंजी तुम्हाला दिली आहे तो रामजी तुमच्यावर रुसेल.कारण खोट्या व्यापारात ७७,७६,००००० श्वासाचा मनुष्यदेह

झिजून राहिला आहे. ।।२५।।

**छेसे सेंस इकीसूं सासा ।। राम भजन के लेखे ।।**
**अेक रेण दिवस मे अेतो दिवाळो ।। जासी जलम अलेखे ।।२६।।**

परमात्मा रामजीने प्रत्येक मनुष्य जीवाला ७७७६००००० श्वास पूर्ण १०० वर्षासाठी दिले.रामभजन करण्याचे लेखे(निमित्त)दिले आहे म्हणजे एक दिवस आणि रात्र असे २४ घंट्याचे २१,६०० श्वास रामभजनात लावावे असे दिले आहे.असे एक दिवस आणि रात्रीचे २१,६०० श्वास,असे प्रत्येक दिवस आणि रात्रीचे श्वास त्रिगुणी मायेच्या विकारात लावतच राहीले तर ७७,७६,००००० श्वास कधी संपून जातील आणि आणलेली पुंजी रामजीच्या सौदयात न लावता खोट्या व्यापारात लावल्याने जीवाच्या मनुष्य देहाच्या पुंजीचे दिवाळे निघून जाईल आणि इतक्या मुश्किलीने मिळालेला मनुष्य जन्म व्यर्थ जाईल. ।।२६।।

**सागे दाम धणीका देणा ।। ईधका लाभ कमाई ।।**
**तोटो देतो स्हा नही धीजे ।। इण मे क्हा भलाई ।।२७।।**

जसे कोणी मनुष्य कोण्या सावकाराकडून लाभ कमाई करण्यासाठी रक्कम आणतात. ती आणलेली रक्कम सोडून जे धन मिळते ती त्याची लाभ कमाई बनते.जर साहुकारा कडून आणलेली रक्कम जितकीची तितकी राहिली नाही तर तोटा होवून राहिला आहे हे समजा.हा तोटा ज्या साहुकाराजवळून रक्कम घेतली त्याला समजले तर तो सावकार बेचैन होईल.सावकाराचे बेचैन होणे यात कर्ज घेण्याऱ्याची काय भलाई राहिल?याचप्रकारे दररोजचे २१,६०० श्वास रामजीचे स्मरण करण्यासाठी जीवाने रामजी साहुकाराकडून आणले.ते २१,६०० श्वास रामजीचे नाव घेण्यात लावले नाही आणि मोहमाया व पाच विषय विकाराच्या सुखात लावले तर रामजीची नाराजी होईल,अशा रामजीच्या नाराजीत जीवाची काय भलाई होईल? ।।२७।।

**खोटो खरो बिणज नही समज्यो ।। हाण लाभ नही जाण्यो ।।**
**पड्यो दिवाळो क्हा जाय दाखे ।। ज्यू बिणज ठगायो बाण्यो ।।२८।।**

ज्याप्रकारे वाण्याला नफा होणारा व्यापार कोणता आहे आणि तोटा होणारा व्यापार कोणता आहे हे समजत नाही आणि तोटा होणाऱ्या व्यापारात लागून राहतो.शेवटी दिवाळे निघून जाते.असा व्यापारी व्यापारात ठगून दिवाळे निघाल्याने दु:खी होवून जातो आणि ठगल्या गेल्याची चूक केल्याने दिवाळे निघाले हे कोणाच्या समोर उजागर होवून बोलू ही शकत नाही.याचप्रकारे जीव मनुष्यदेहात आल्यावर खऱ्या रामजीचे स्मरण आणि खोट्या त्रिगुणीमायेचे कर्म या दोघात लाभ कशात आहे आणि नुकसान कशात आहे हे समजला नाही आणि ७७,७६,००००० श्वासाचा मनुष्य देह त्रिगुणी

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

मायेच्या कर्मांत लावून ठगला जातो.(कुटुंब परीवार....मायावी आकांक्षात)आणि काळाच्या मुखात पड्तो.असा जीव काळाचे दुःख समजत असतांना नाड्ल्या(ठगल्या)नंतर कोणाला जावून सांगेल? ।।२८।।

**खोटे बिणज खोवसी पूंजी ।। खोटे स्हा रिसावे ।।**
**जम की जेळ पडेली गळ मे ।। राजद्वार बंधावे ।।२९।।**

जसे कोणी सावकाराकडून रक्कम घेतली आणि जुवा बाजीत गमविली तर सावकार रक्कम घेणाऱ्यावर रुसेल आणि राजाच्या दरबारात बांधून कारागृहात टाकतो. याच प्रकारे रामजीने दिलेला मनुष्यदेह गमविल्यावर रामजी रुसतात ज्याने यम जीवाला नर्कात टाकेल.।।२९।।

**गिणिया सास घटे दिन बीते ।। वी सासो की बारी ।।**
**छिंत्र लाख सतंत्र क्रोडुँ ।। तोइ भजन बिना भिक्कारी ।।३०।।**

प्रत्येक मनुष्याला ७७,७६,०००००श्वास मोजून मिळाले आहे.त्याच्यातून एक एक श्वास खोट्या त्रिगुणीमायेच्या व्यवहारात लावून खऱ्या रामजीचा सौदा करण्यासाठी कमी होत आहे असे ७७,७६,००००० श्वास मिळाल्यावरही रामजीच्या स्मरणाचा सौदा केला नाही तर जसे अनमोल मनुष्य तन प्राप्त करण्याच्या आधी जीव ८४०००००योनीत प्रत्येक सुखाच्या चाहणेसाठी भिकारी होता तसाचा तसा भिकारी बनलेला राहिल. ।।३०।।

**खातो ध्रमराय कूं सूंप्यो ।। हिसाब हुयाँ पिस्तासी ।।**
**मूळ माहे मिनखा देहे हारी ।। ब्याज माहे दुःख भारी ।।३१।।**

७७,७६,००००० श्वास संपल्यानंतर मनुष्य शरीरातून प्राण निघून जातो.प्राण मनुष्य देह त्यागल्यानंतर मनुष्य देहात जे जे कर्म केले त्याची खतावणी चित्र आणि गुप्त धर्मरायकडे सोपवतात.धर्मराय जीवाला गुप्त आणि प्रगट केलेल्या कर्मांचे खाते ऐकवतो तर जीवाला ज्या देहाने काळापासून मुक्त होता येत होते आणि रामजीच्या महासुखात जाता येत होते असा मुद्दलमध्ये मिळवलेला अनमोल मनुष्य देह हारल्यावर आणि जगात मुद्दलवर जे व्याज द्यावे लागते अशा मनुष्य देहाचे मुद्दल खाल्ल्यानंतर ४३,२०,००० वर्षांपर्यंत ८४,००,००० योनीत भारी दुःख भोगण्याचे व्याज ऐकून जीव पस्तावा करु लागतो.।।३१।।

**दोजख दुःख जम की मारा ।। जलम मरण दुःख भारी ।।**
**लख चौरासी वार न पारा ।। भुक्ते गो जुग चारी ।।३२।।**

व्याजात ८४ प्रकारच्या नरकाचे दुःख आणि ८४ लक्ष प्रकारच्या शस्त्रांचा यमाचा मार तसेच ४३,२०,००० वर्षातर्यंतचे चार युग-सत,त्रेता,द्वापार,कलियुगात८४ लक्ष प्रकारचे जन्म मरणाचे भारी दुःख भोगतो.।।३२।।

च्यार जुगाँ का बरस बदीता ।। लाख तीन चाळीसा ।।
अेती मार सहे सिर ऊपर ।। ओर स्हेंश्र बीसा ।।३३।।

चार युगाचे ४३,२०,०००वर्ष व्यतीत होतात तोपर्यंत जीव शिरावर मार सहन करतो. हा साधारण जीवाच्या समजच्या हजारपट मार राहतो हे समजा. ।।३३।।

च्यार जुगा बिच अेकै बारा ।। ओसर नर तन पावे ।।
सतगुरू मिल्याँ बिन जिव सूना ।। फिर चौरासी आवे ।।३४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज प्रत्येक स्त्री,पुरुषांना सांगून राहिले आहेत की,चार युगात ८४लक्ष योनी भोगल्यावर एक वेळा मानवतन मिळते.हे मानवतन रामजीच्या देशात पोहचविणारे सतगुरु नाही मिळाले तर जीव रामजी प्राप्त करण्यात खाली म्हणजे विना छत्राचे राहून जातात.असे झाल्यावर जीव पुन्हा ४३,२०,००० वर्षाकरीता ८४ लक्ष योनीत जाऊन पड्तो. ।।३४।।

सिंवरो राम सकळ दु:ख भागे ।। सतगुरू सरण समावो ।।
सतगुरू हात अमर परवाना ।। नर तन पटे लिखावो ।।३५।।

हे सर्व ८४ प्रकारचे नरकाचे दु:ख,यमाचा अनेक प्रकारचा मार,४३,२०,००० वर्षां पर्यंतचा ८४,००,०००योनीत जन्म-मरण्याचे दु:ख सतगुरुचा शरणा घेवून रामनाम स्मरण केल्याने पळून जाते.सतगुरुच्या हातात अमरलोकात अमरदेह देण्याचा अमर परवाना आहे.याकरीता सर्व स्त्री,पुरुषांना मनुष्य देहात अमरलोक प्राप्त करण्याचा सतगुरु पासुन पट्टा लिहुन घेतला पाहिजे.।।३५।।

अेसा पटा लिखे गुरूदेवा ।। अमर आंक मुख माई ।।
ब्होर न भव जळ आवे हंसा ।। जिवण मुक्त होय जाई ।।३६।।

सतगुरुच्या मुखात अमरलोकाचा पट्टा लिहून देण्याचा परवाना असल्या कारणाने शरणात आलेल्या हंसाला जन्म-मरणापासुन मुक्त करुन अमरलोकाचा पट्टा लिहुन देतात.या सतगुरुच्या पट्टयाने जीव एकच मनुष्य जीवनात मुक्त होऊन जातो आणि पुन्हा भवसागराच्या जन्म-मरणाच्या चक्रात कधी येत नाही. ।।३६।।

सिंवरो बेग बिलम न कीजे ।। सतगुराँ अग्या कीनी ।।
सासो सास रटो आ रसणा ।। राम भजन कू दीनी ।।३७।।

जीव सतगुरुच्या शरणात येताच जीवाला सतगुरु आज्ञा देतात आणि विना विलंब वेळी अवेळी रामजीचे स्मरण करायला लावतात.सतगुरु जाणतात की,मनुष्याची आयु खूप कमी आहे आणि काळ अनचिंत्याच जीवाला घेवून जातो.याकरीता रामजीचे स्मरण करण्यात थोडासाही विलंब करु देत नाही.जी रामाने रसना(जीभ)दिली आहे तिच्याने श्वासा-श्वासात धारोधार रामभजन करवितात. ।।३७।।

**ओ जग नींद सिष जद ऊठया ।। सुण सतगुराँ की बाणी ।।**
**माया मोहो भ्रम की रजनी ।। जाग्याँ सकळ बिलाणी ।।३८।।**

सतगुरु मुखातून ज्ञान ऐकून माया मोहाच्या भ्रमाच्या झोपेतून शिष्य सतस्वरुपाच्या ज्ञानाने जागृत झाला आणि उठताच माया मोहची भ्रमाची घनघोर रात्र पूर्ण तर्‍हेने नष्ट होवून गेली. ।।३८।।

**वाँहा गुरां की इम्रत बाणी ।। मृतक जीव जिवाया ।।**
**होय सरजीत राम क्हे बोल्या ।। सब्द स्त्रवणां आया ।।३९।।**

सतगुरुच्या अमृत वाणीला धन्य आहे.मायेच्या सारखा जो जीव मृतक होवून गेला होता तो सतगुरुचे शब्द श्रवण करताच जिवंत होवून गेला आणि राम म्हणायला लागला. ।।३९।।

**उबक्या नांव ब्रम्ह की अग्या ।। मुख बिच रस्ना हाले ।।**
**धँवण लगी धीर नही बंधे ।। वे सब्द गुराँ का साले ।।४०।।**

सतस्वरुप ब्रम्हच्या आज्ञेने नाम जीभेवर उबकू लागले आणि मुखात रसना नाम घेण्यात जोर जोरात हलू लागली.श्वासोश्वासात धवण लागून गेली आता जीवाला धीर राहिला नाही आणि अमरदेशाचे गुरुचे शब्द लवकर अमरदेशात पोहचण्यासाठी खूपू (टुचू)लागले. ।।४०।।

(येथे पर्यंत चाळीस श्लोकांचा अर्थ झाला,पुढे या ग्रंथात ध्यानाच्या गोष्टी आहेत,साठ श्लोक ध्यान संबधी गोष्टी वर्णनाच्या आहेत,त्या चवथ्या भागात भाषांतर करण्याचा विचार आहे, कारण ही ध्यानाची सौदागीरी करुन,नफा मिळविण्याचे ज्ञान आहे.)